**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी संपणार

- अखेरच्या टप्प्यात सर्वच राजकीय पक्षांचा मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी निकराचा प्रयत्न

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पासून तीन दिवस कन्याकुमारीच्या दौऱ्यावर

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस दोन दिवस आधीच केरळात दाखल

**आणि**

- मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी स्थानक  आणि ठाणे स्थानकात प्लॅटफॉर्म रुंदीकरणाच्या कामासाठी आज मध्यरात्री पासून विशेष मेगा ब्लॉक/ ९५६ उपनगरी गाड्या तर लांब पल्ल्याच्या ७२ गाड्या रद्द

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी संपेल. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून  ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या शनिवारी मतदान होणार आहे. त्यात बिहारमधल्या ८, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडच्या ३, ओदिशातल्या ६, पंजाबमधल्या सर्व १३ उत्तरप्रदेशातल्या १३, पश्चिम बंगालमधल्या ९, आणि चंडीगढमधल्या एका जागेचा समावेश आहे. या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदानही येत्या शनिवारी होणार असून त्या ४२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होईल. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजी होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २जून रोजी होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठीच्या आजच्या शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांनी सभांचा धडाका लावला आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज पंजाबमधल्या होशियारपूर इथं प्रचारसभेला संबोधित करतील. तर भाजपाचे ज्येष्ठ नेते जे. पी. नड्डा अमृतसर, रुपनगर आणि फरीदकोट इथं प्रचारसभा घेणार आहेत.

पंजाबचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते भगवंत मान पंजाबमधल्या विविध जिल्ह्यात रोड शो घेणार आहेत.

**संरक्षणमंत्री** आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह हे उत्तरप्रदेशमधल्या कुशीनगर, रॉबर्ट्सगंज आणि चंदौली लोकसभा मतदारसंघातल्या प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. तसंच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव कुशीनगर आणि सोनभद्रमध्ये रोड शो घेणार आहेत. तर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव घोसी आणि महाराजगंज मतदारसंघात प्रचारसभा घेणार आहेत.

**बिहारचे उपमुख्यमंत्री** सम्राट चौधरी राज्यातल्या विविध मतदारसंघात प्रचारसभा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा हे देखील भाजपा

उमेदवारांसाठी प्रचार करणार आहेत. **राजदचे प्रमुख** लालू प्रसाद यादव पाटलीपुत्र मतदारसंघात मतदारांशी संवाद साधणार आहेत. तर राजद नेते तेजस्वी यादव आज आठही मतदारसंघातल्या मतदारांशी संवाद साधतील. **झारखंडचे मुख्यमंत्री** चंपई सोरेन गोड्डा, दुमका आणि साहिबगंज मतदारसंघात इंडिया आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. तर भाजपाचे झारखंड प्रदेशाध्यक्ष साहिबगंज आणि गोड्डा इथं भाजपा उमेदवारांसाठी प्रचार करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पासून तीन दिवस कन्याकुमारीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. तिरुवअनंतपुरमहून आज संध्याकाळी ४ च्या सुमारास ते कन्याकुमारीला पोहोचतील. त्यानंतर ते भगवती मंदिरात दर्शनासाठी जातील. त्यानंतर एम एल विवेकानंद नौकेवरुन ते विवेकानंद स्मारकात जातील. तिथे ते ३ दिवस ध्यानधारणा करणार आहेत. त्यानंतर तिरुवेल्लुरला भेट देऊन ते तिरुवअनंतपुरमला परततील.

**<><><><><>**

देशातल्या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महसूल मिळवण्यासाठी एनएचएआय, अर्थात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं एक उपक्रम सुरु केला आहे.  या अंतर्गत भारतातलं महामार्गांचं जाळं टिकवून ठेवण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातींकडून गुंतवणूक मिळवण्याचा एनएचएआय चा प्रयत्न आहे. त्या अनुषंगानं, एनएचएआय चे अध्यक्ष संतोष कुमार यादव यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ एनएचएआय इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट च्या माध्यमातून सध्या दुबई आणि अबुधाबी इथल्या गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उच्चस्तरीय बैठका आणि  रोड शो आयोजित करत आहे.

भारतातल्या महामार्गांच्या विस्तारासाठी शाश्वत निधी मिळवणं, मोठ्या प्रमाणात भांडवल आकर्षित करणं आणि गुंतवणूकदारांबरोबरच्या फायदेशीर भागीदारीला चालना देणं हे यामागचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

गोवा आज ३७ वा राज्यस्थापना दिवस साजरा करीत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यानिमित्त गोव्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गोव्यातली माणसं त्यांच्या प्रगतीशील मूल्य आणि आदरातिथ्य यासाठी ओळखले जातात. हे सुंदर राज्य आणि तिथली जनता समृद्ध राहून विकासाच्या वाटेवर पुढे जावी, अशी इच्छा राष्ट्रपती मुर्मू यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेपूर्वीच दोन दिवस दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तामिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह, ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

देशाच्या वायव्य प्रांतातली तीव्र उष्णतेची लाट आजपासून ओसरू लागेल, तसंच पश्चिमेकडच्या जोरदार वाऱ्यांच्या प्रभावामुळे या भागात येत्या २ जून पर्यंत मेघगर्जनेसह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, दिल्लीत काल नोंदवलं गेलेलं उच्चांकी तापमान मंगेशपुरी भागातल्या हवामान विभागाच्या स्वयंचलित सेन्सरमधल्या त्रुटींमुळे असू शकेल, असं स्पष्टीकरण हवामान विभागानं जारी केलं आहे. दिल्लीमध्ये काल ५२ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस उच्चांकी तापमानाची नोंद झाली होती.

**<><><><><>**

मुंबईत मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि ठाणे रेल्वे स्थानकांत प्लॅटफॉर्मचं रुंदीकरण आणि विस्ताराच्या कामासाठी आज मध्यरात्री पासून विशेष मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे. हे काम रविवारी दुपारपर्यंत चालणार आहे. रुंदीकरणाच्या कामासाठी ठाणे इथं ६३ तासांचा तर सीएसएमटी स्थानकात ३६ तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे. मेगा ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या २३ टक्के, म्हणजे एकूण ९५६ लोकल फेऱ्या आणि ७२ मेल-एक्स्प्रेस रद्द होणार आहेत. अनेक लांब पल्ल्यांच्या काही गाड्या रद्द केल्या आहेत तर कोकणात जाणाऱ्या आणि येणाऱ्या गाड्या पनवेल स्थानकातून सुटतील. उपनगरीय रेल्वे फेऱ्या अंशतः रद्द केल्या जाणार आहेत. शनिवारी, १ जून रोजी रविवारच्या वेळापत्रकानुसार उपनगरी गाड्या चालवण्यात येणार आहेत. यामुळे रेल्वे स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी शक्य असल्यास रेल्वे प्रवास टाळा, असं आवाहन मध्य रेल्वे प्रशासनानं केलं आहे. हे काम पायाभूत सुविधांच्या सुधारणा आणि फायद्यासाठी आवश्यक असल्यानं प्रवाशांनी सहाकार्य करावं, अशी विनंती मध्य रेल्वे प्रशासनानं केली आहे.

**<><><><><>**

दिल्लीतल्या अबकारी घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी नियमीत जामीन मिळवण्यासाठी राऊज अवेन्यू न्यायालयात

याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज दुपारी दोन वाजता सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयानं केजरीवाल यांना १० मे रोजी १ जूनपर्यंत लोकसभा निवडणूकीतील प्रचारासाठी अंतरिम जामीन मंजुर केला होता. दरम्यान, याप्रकरणी दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची कोठडी राऊज अव्हेन्यू न्यायालयानं येत्या ६ जुलै पर्यंत वाढवली आहे.

**<><><><><>**

देशभरात आज हिंदी पत्रकारिता दिवस साजरा केला जात आहे. पंडित जुगल किशोर शुक्ला यांनी ३० मे १८२६ रोजी 'उदंत मार्तंड' हे पहिलं हिंदी वर्तमानपत्र सुरू केलं होतं. त्या पार्श्वभूमीवर हिंदी पत्रकारितेच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. उदंत मार्तंड वर्तमानपत्राने भारतीय समाज आणि संस्कृतीसाठी भरीव कार्य केलं. त्यामुळे भारतीय पत्रकारितेत उदंत मार्तंडला मैलाचा दगड समजलं जातं.

**<><><><><>**

जेद्दाह इथल्या भारतीय वाणिज्य दूतावासाच्या भारतीय हज मिशननं हज यात्रेकरूंसाठी केलेल्या निवास व्यवस्थेची यात्रेकरू प्रशंसा करत आहेत. मिशननं भारतीय हज कमिटीच्या माध्यमातून, तिथं येणाऱ्या १ लाख ४० हजार यात्रेकरूंच्या निवासाकरता, सुमारे ४०० इमारती भाड्यानं घेतल्या आहेत. हज यात्रेकरूंच्या समस्यांचं त्वरित निराकरण व्हावं, यासाठी हज मिशनचे कर्मचारी चोवीस तास काम करत आहेत.

**//<><><><><>//**